सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# नोंदणी व मुद्रांक विभाग

## नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय

नविन प्रशासकीय इमारत, तळमजला, विधान भवन समोर, पुणे- ४११ ००१

दुरध्वनी क्र. ०२०-२६०५२४३ ई-मेल :- do5.igro@igrmaharashtra.gov.in

जा.क्र.का.5/मुद्रांक-23/प्र.क्र.6/2016/ ८०५ /2023 दि.:- 12 /12/2023

प्रति,

Managing Director and CEO
National e-Governance Services limited
003A, Ground floor, The estate,
121, Dickenson Road, Bengluru- 560042

विषयः महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम 10ड अंतर्गत NeSL प्रणालीवर अनुसूची 1 मधील 5h(B), 6(1), व 6(3) या अनूच्छेदांचा समावेश करणेबाबत.

संदर्भ-1.महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध अधिसुचना क्र. असाधारण चार-ब क्रमांक 269 दि. 23/09/2021.

2. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. क्र.का.5/मुद्रांक 21/प्र.क्र.06/2016/ 480/21 दि. 27/10/2021.
3. या कार्यालयाचे शासनास पत्र जा. क्र.का.5/मुद्रांक 21/प्र.क्र.06/2016/ 376/23 दि. 19/05/2023.
4. महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध अधिसुचना. क्र. मुद्रांक-2021/ 68/प्र.क्र.69/म-1 (धोरण) असाधारण चार-ब क्रमांक 451 दि. 04/12/2023.

यथोचित मुद्रांक शुल्काचा भरणा करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, बहुराज्यीय अनुसूचित बँका, सर्व सहकारी बँका, सर्व खाजगी बँका, विदेशी बँका आणि बँकेतर वित्तीय कंपन्यांना शासनाच्या संदर्भ क्रमांक 1 च्या अधिसुचनेद्वारे सहभागी करुन घेण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने प्रणाली कार्यान्वीत करण्याची परवानगी संदर्भ क्रमांक 2 च्या पत्रान्वये नोंदणी व मुद्रांक विभागाने NeSL या कंपनीस दिलेली आहे.

सद्य स्थितीत सदर प्रणालीवर अधिनियमाच्या खालील अनुच्छेदांच्या अनुषंगाने मुद्रांक शुल्क भरणा करण्यात येतो.

| अनुच्छेद क्र. | दस्तऐवजाचा प्रकार |
|---|---|
| १ | ऋणाची अभिस्वीकृती |
| ४ | प्रतिज्ञालेख |
| ५(ह) (अ) (चार) | सुविधा करारनामा किंवा कर्ज करारनामा (जर तो गहाणखत, हक्क तर विलेख-निक्षेप, हडप, तारण किंवा तारण गहाण यामध्ये मोडत नसेल तर) |
| ६(२) | जंगम मालमत्तेचे तारण किंवा तारण गहाण |
| १३ | बंधपत्र |
| ३५ | क्षतिपूर्ति बंधपत्र |
| ४८ | मुखत्यारनामा [अनुच्छेद ४८ (फ) वगळून] |
| ५३ | नौभार बंधपत्र |
| ५४ | प्रतिभूती बंधपत्र |

महाराष्ट्र शासन अधिसुचना जा.क्र.मुद्रांक 2015/1049/प्र.क्र.334/म-1 दि. 03/06/2016 (शासन अधिसुचना क्रमांक मुद्रांक/2021/68/प्र.क्र./69/म-1(धो.) दि. 08/09/2021 अन्वये सुधारित) अनुक्रमांक 83 मधील नोंदीत महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुच्छेद 5(ह)(ब), 6(1), 6(3), 28 या अनुच्छेदांचा समावेश करण्याची विनंती संदर्भ क्रमांक 3 च्या पत्रान्वये विभागाकडुन शासनास करण्यात आलेली होती. विभागाच्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाने संदर्भ क्रमांक 4 च्या अधिसुचनेद्वारे सदर प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील अनुच्छेद 28 मध्ये अजुन काही बाबींची पुर्तता करणे गरजेचे असल्याने सदर अनुच्छेद वगळता अनुच्छेद 5(ह)(ब), 6(1), 6(3) या अनुच्छेदांचा समावेश NeSL-10ड प्रणालीवर करण्याची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

12/1/23

हिरालाल सोनवणे (भा.प्र.से)
नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य पुणे

प्रत-

राष्ट्रीय सूचना-विज्ञान केन्द्र, (एनआईसी), पुणे

2/- Maharashtra 10D -NESL DDE प्रणालीत पत्रात दिल्याप्रमाणे बदल करण्यात यावेत.

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक १६१] सोमवार, डिसेंबर ४, २०२३/अग्रहायण १३, शके १९४५ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४५१**

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ डिसेंबर २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्र. मुद्रांक-२०२१/६८/प्र.क्र.६९/म-१(धोरण).— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा महा. ६०) याच्या कलम १०ड च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, शासकीय अधिसूचना महसूल व वन विभाग, क्र. मुद्रांक-२०१५/ १०४९/प्र.क्र.(३३४)म-१, दिनांक ३ जून २०१६ यामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेला जोडलेल्या अनुसूचीमध्ये, अनुक्रमांक ८३ च्या नोंदीमधील, स्तंभ(३) मधील, "जंगम मालमत्तेचे तारण किंवा तारणगहाण [अनुच्छेद-६(२)], बंधपत्र (अनुच्छेद-१३)", हे शब्द, कंस व अंक या ऐवजी, पुढील शब्द, कंस व अंक समाविष्ट करण्यात येतील:

"करारनामा किंवा त्याचे अभिलेख किंवा कराराचा संक्षेपलेख [अनुच्छेद-५(ह)(ब)], हक्कविलेख, हडप, तारण किंवा तारणगहाण यांचा निक्षेप करण्याशी संबंधित असणारा करारानामा [अनुच्छेद-६(१)], जंगम मालमत्तेचे तारण व तारणगहाण [अनुच्छेद-६(२)], हक्कविलेंख, हडप, तारण किंवा तारणगहाण यांचा निक्षेप करण्याशी संबंधित असणारा करारनामा [अनुच्छेद-६(३)], बंधपत्र (अनुच्छेद-१३), सीमाशुल्क बंधपत्र किंवा उत्पादन शुल्क बंधपत्र (अनुच्छेद-२८),".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**
शासनाचे अवर सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 4th December, 2023.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA STAMP ACT.

No. Mudrank-2021/68/C.R.69/M-1(Policy).— In exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 10D of the Maharashtra Stamp Act (LX of 1958), the Government of Maharashtra, hereby amends the Government Notification, Revenue and Forests Department, No. Mudrank-2015/1049/ CR-(334)M-1, dated the 3rd June 2016, as follows, namely :—

In the Schedule appended to the said Notification, in entry at serial number 83, in column (3) for the words, brackets and figures, "Pledge or Hypothecation of Movable Property [Article-6(2)]. Bond (Article-13)", the following words, brackets and figures shall be substituted, namely:

"Agreement or its Records or Memorandum of an Agreement [Article-5(h)(B)], Agreement Relating to Deposit of the Title Deeds, Pawn, Pledge or Hypothecation [Article-6(1)], Pledge or Hypothecation of Movable Property [Article-6(2)], Agreement Relating to Deposit of the Title Deeds, Pawn, Pledge or Hypothecation [Article-6(3)], Bond (Article-13), Customs Bond or Excise Bond (Article-28),".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE,
Under Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.